दै. तरुण भारत १८ नोव्हेंबर २००५

# अभ्यासक्रमातील नवे बदल शिक्षण प्रक्रियेस पोषक –डॉ. नसिराबादकर

▶ कोल्हापूर / प्रतिनिधी

'अभ्यासक्रमातील नवे बदल शिक्षण प्रक्रियेस पोषक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या संवेदना जाग्या करुन त्या प्रगल्भ करणे गरजेचे आहे.' असे मत डॉ.ल.रा.नसिराबादकर यांनी व्यक्त केले.ते शिवाजी विद्यापीठ व कमला कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या महाविद्यालयीन मराठी शिक्षक प्रशिक्षण शिबिरात बोलत होते.

उद्‌घाटन प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी पाटील म्हणाले, अभ्यासक्रमात नविन बदल करणे ही काळाची गरज आहे. पाश्च्यात राष्ट्रात उद्योग धंद्यांना पुरक अभ्यासक्रम तयार केले जातात त्यामूळे अभ्यासक्रमाला नाविन्याची जोड राहते. डॉ.नसिराबादकर म्हणाले, अभ्यासक्रमात नामदेवाचे अभंग आहेत ते लोकमानसात रुजवले पाहिजेत. समाजबदलाची बिजे ज्ञानदेव व नामदेवाच्या अभंगात आढळते. अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या संग्रहाविषयी डॉ. कृष्णा किरवले म्हणाले, दलित साहित्यातील अरुण काळे हे तिसऱ्या पिढीचे लेखक आहेत.त्यांच्या कविता भारताची नवी ओळख करुन देतात. यावेळी प्राध्यपकांनी आपले शोधनिबंध ही सादर केले. संयोजन प्रा.सुजय पाटील यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. डॉ.तेजस्विनी मुडेकर व प्रा.निता धुमाळ यांनी केले. आभार प्रा.नेताजी पोवार यांनी मानले. यावेळी मराठी विषयाचे प्राध्यापक उपस्थित होते.